**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक १०/०३/२०२५ (सोमवार)

---

## घरफोडीचे ७ गुन्हे उघड , ५ लाख ६८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन कळमेश्वर गुन्हे रजि.नं ३४/२०२५ कलम ३३१(२),३०५,६२ भा.न्या.स. तसेच पोलीस स्टेशन नरखेड गुन्हे रजि.नं. ४९/२०२५, गुन्हे रजि.नं ५०/२०२५ आणि गुन्हे रजि.नं ५१/२०२५ कलम ३३१(४),३०५(अ),३(५) भा.न्या.सं अशा घरफोडीच्या दाखल गुन्हयांचा तपास स्थानिक पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. सदर तपासामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी आरोपी नामे १. **रितेश अश्वजीत वानखेडे रा. इमामवाडा नागपुर आणि २.रोहीत खोब्रागडे, रा. रामबाग, नागपुर यांना यापुर्वीच अटक केली होती. त्यावेळी त्यांच्याकडुन त्यांचे साथीदार** १) **असलम उर्फे आशु अब्दुल शरीफ खान रा.यशोधरा नगर नागपुर** २) **आयुष आशिष लखोटे, रा. रामबाग नागपुर याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याची माहीती प्राप्त झाली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नमुद आरोपीतांचा शोध घेत असतांना आज** दिनांक १०/०३/२०२५ रोजी गुप्तबातमीदार कडुन माहिती मिळाली की, १) **असलम उर्फे आशु अब्दुल शरीफ खान रा. यशोधरा नगर नागपुर** २) **आयुष आशिष लखोटे, रा.रामबाग नागपुर** हे दोघे पो.स्टे. खापा हदीमध्ये वाकी दर्गा या ठिकाणी हजर आहे. अशी माहीती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी जावुन पोलीसांनी दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांना सदर गुन्हंयाबाबत विचारपुस केली असता आरोपीतांनी त्यांचे साथीदार नामे **रितेश अश्वजीत वानखेडे, रा. इमामवाडा नागपुर, रोहीत खोब्रागडे, रा. रामबाग, नागपुर** यांचेसह मिळुन दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिली. नमुद आरोपीतांना अजुन सखोल विचारपुस केल्यावर त्यांनी इतर ३ घरफोडीच्या गुन्हयांबाबत माहीती दिली. तसेच सदर गुन्हयातील मुद्देमाल आरोपीतांनी **सोनार दुकानदार**

**अजय मोहनलाल सोनी वय ४८ वर्षे राहणार फ्लॅट न.१०३ उत्कर्ष अपार्टमेट नाईक गल्ली इतवारी नागुपर** याला विकल्याबाबत माहीती दिली. नमुद अरोपीतांकडुन पोलसांनी **१) सोन्याचांदीचे दागिने, सिक्के, ऐवज, १ दुचाकी कमांक एम.एच ४९ सीएम ३६८१ , २. अॅड्रॉईड फोन असा एकूण किंमती ५,६८,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाईत आरोपी नामे १) असलम उर्फे आशु अब्दुल शरीफ खान रा. यशोधरा नगर नागपुर** २) **आयुष आशिष लखोटे, रा.रामबाग नागपुर यांना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. ४९/२५ कलम ३३१(४),३०५(अ),३(५) भा.न्या.स.

२) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. ५०/२५ कलम ३३१(४),३०५(अ),३(५) भा.न्या.स.

३) पोलीस ठाणे नरखेड गुन्हे रजि.नं. ५१/२५ कलम ३३१(४),३०५(अ),३(५) भा.न्या.स.

४) पोलीस ठाणे कळमेश्वर गुन्हे रजि.नं. ३४/२५ कलम ३३१(२),३०५,६२ भा.न्या.स.

५) पोलीस ठाणे कळमेश्वर गुन्हे रजि.नं. ११५/२५ कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) भा. न्या.स.

६) पोलीस ठाणे कळमेश्वर गुन्हे रजि.नं. १०५/२५ कलम ३३१(४),३०५(अ),६२ भा.न्या.स.

७) पोलीस ठाणे सावनेर गुन्हे रजि.नं. ७२/२५ कलम ३३१(४),३०५(अ) भा.न्या.स.



## घरफोडीचे २ गुन्हे उघड , ६ लाख ५७ हजार ६४० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अप क्रमांक १२४/२०२५ कलम ३३१(४),३०५( अ ) भारतीय न्याय संहिता हा गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाचा तपास खापरखेडा पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला असता पोलीसांना तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सदर गुन्हा आशिक उर्फ भांजा अन्सारी, रा माडा कॉलनी कामगार नगर, नागपूर यांनी त्याचे साथीदारासह केला आहे. पोलीसांनी सदर आरोपीचा कसुन शोध घेवुन आरोपीला ताब्यात घेवुन त्यास गुन्हयाबाबत विचारपूस केली असता त्यांनी त्याचे साथीदार नामे २) शब्बीर उर्फ सप्पू आयुब खान, रा.टिपू सुलतान चौक, यशोधरा नागपूर ( पाहिजे आरोपी) ३) शहबाज उर्फ अरहान शेख, रा. टिपू सुलतान चौक यशोधरा नागपूर ( पाहिजे आरोपी) यांच्या सह सह दिनांक १८/०२/२०२५ रोजी खापरखेडा येथे घरफोडी केल्याची माहीती दिल्याने तसेच काही दिवसा अगोदर देखील खापरखेडा येथे घरफोडी केल्याची माहीती दिल्याने त्याचे आरोपीच्या ताब्यातून पंचासमक्ष **सोन्या चांदीचा ऐवज किंमती ५,५४,५४०/— रूपये, रोख रक्कम २०००/— रुपये,३) गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची बर्गमन दुचाकी क्रमांक एम एच ४९ सी एच ६९३९ किमती ९०,०००/— रुपये, ४) अँड्रॉइड मोबाईल किमती १०,०००/—रुपये असा एकूण ६,५७,६४०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपीला अटक करण्यात आली** असुन पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहेत.

**उघडकीस आलेले गुन्हे**

(१) पोस्टे खापरखेडा अप क्रमांक १२४/२०२५ कलम ३३१(१),३०५( अ) भा. न्या.सं

(२) पोस्टे खापरखेडा अप क्रमांक ३७/२५ कलम ३३१(४),३०५ भा. न्या.सं

.


स्थानिक गुन्हे शाखा,
नागपूर ग्रामीण

